परिपत्रक नं. ३४

रयत शिक्षण संस्था, सातारा
कायदा विभाग,
ता. १५-१०-२०१६

सर्व शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था.

## विषय- नैतिक अधःपतन व गैरवर्तणुकीसंबंधी करावयाच्या कारवाई बाबत.

संदर्भ - महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. / प्राशिधो २०१३ / प्र.क्र.२४/ प्राशि-१ ता. २२ फेब्रुवारी २०१३

शिक्षणक्षेत्रात कार्यरत असताना सर्व शिक्षकांकडून मूल्ये व प्रतिष्ठा.जपणे अभिप्रेत आहे. शिक्षकाचे दैनंदिन वर्तनाकडे विद्यार्थी व समाज यांचे बारकाईने लक्ष असते म्हणून त्याचे दैनंदिन वर्तन हे प्रतिष्ठेस अनुरुप व मुल्याधिष्ठित असावे. तसेच शिक्षणक्षेत्रातील मूल्यांचे अनुकरण शिक्षकेत्तर सेवकांनीही करणे गरजेचे आहे. तथापि या वर्तनाचे उल्लघंन होत असल्याचे काही प्रकार संस्थेच्या निदर्शनास आले आहेत. ही बाब अत्यंत गंभीर आहे.

संस्थेची महाविद्यालये, विद्यालये, प्राथमिक शाळा, आश्रमशाळा, प्रशासकीय कार्यालये व इतर सर्व अनुषंगिक शाखांमध्ये काम करीत असलेल्या सेवकांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, संस्थेच्या विविध शाखांमध्ये विद्यार्थिनी अगर स्त्री कर्मचारी यांचे बाबतीत अनैतिक वर्तनाचे प्रकार घडल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) पिडीत विद्यार्थिनी अगर स्त्री कर्मचारी यांनी संबंधित सेवकाविरुध्द केलेल्या तक्रारीबाबतचा वस्तुनिष्ठ लेखी जबाब घेण्यात यावा. पिडीत विद्यार्थिनीच्या अगर स्त्री कर्मचारी यांच्या पालकांचा लेखी जबाब घेण्यात यावा. तसेच शाखेतील सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी व आवश्यक असल्यास ग्रामस्थ यांचेही लेखी जबाब घेण्यात यावेत.

ब) पिडीत विद्यार्थिनी अगर स्त्री कर्मचारी यांनी शाखाप्रमुख / विभागप्रमुख व वर्गशिक्षक यांचेकडे लेखी अगर तोंडी तक्रार केल्यास ती ग्राह्य धरून, त्याची सत्यता पडताळून शाखाप्रमुखांनी तातडीने स्थानिक स्कूल कमिटी, विभागीय कार्यालय व संस्था पदाधिकारी यांच्या निदर्शनास या बाबी आणाव्यात.

क) संबंधित सेवकाविरुध्द विद्यार्थिनी अगर स्त्री कर्मचारी व त्यांच्यां पालकांना तातडीने पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल करण्यास सांगावे. जर विद्यार्थिनी अगर स्त्री कर्मचारी व त्यांच्या पालकांनी संबंधिताविरुध्द पोलीस फिर्याद दाखल केली नाही तर नियुक्त केलेल्या लैंगिक छळ प्रतिबंधात्मक समितीचा प्रमुख या नात्याने शाखाप्रमुखांनी तातडीने संबंधिताविरुध्द फिर्याद दाखल करावी.

ड) फिर्याद दाखल केल्यानंतर सर्व कागदपत्रे विभागीय कार्यालय व संस्थेकडे पाठवावीत. या कामी शाखाप्रमुखांचेकडून निष्काळजीपणा होणार नाही, याची नोंद घ्यावी.

रयत शिक्षण संस्था सातारा

सचिव
रयत शिक्षण संस्था, सातारा.

टीप- हे परिपत्रक शाखेतील सर्व सेवकांच्या निदर्शनास आणावे. स्थळप्रतीवर त्यांच्या सह्या घेवून ती शाखेच्या दफ्तरी ठेवावी व एक प्रत विभागीय कार्यालय यांचेकडे पाठवावी.